# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 22/04/2020 (बुधवार)
(सायंकाळ)

### दुखापत

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर रोहना कन्हान पारशिवनी येथे दिनांक 20/04/2020 चे 20.00 वा. ते 20.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सहादेव नामदेव केळवदे, रा. रोहना, कन्हान पारशिवनी व त्याचा मित्र देवचंद छानीकर हे दोघेही शेतातुन मोटरसायकलवर चवळीच्या शेंगा व भेंडया बांधुन घाटरोहना वरुन नदीमार्गे बिनासंगम येथे जात होते. नदीच्या काठावर डब्लु सी एल च्या पाईपलाईनचे काम सुरु असुन तीथे दोन ते तीन आरोपीतांनी चेहऱ्याला कपडा बांधुन आडवे झाले. तसेच आरोपीतांनी कोणतेही कारण नसतांनी त्यांनी संगनमन करुन फिर्यादीला काठीने डोक्यावर, पायावर मारहाण केली. यानंतर आरोपीतांनी फिर्यादी सोबत असलेला देवचंद छानीकर याच्या डाव्या तळ हाताला मारहाण करून जखमी केले व अंधाराचा फायदा घेत शिवीगाळ करुन निघुन गेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम 326, 504, 34 भा.द.वि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक रविन्द्र चौधरी 9498308932 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत मौजा गायमुख शिवार हिवरा रोड येथे दिनांक 21/04/2020 चे 12:15 वा. ते 12.30 वा. दरम्यान बेनासिंह बाबुसिह बनापत(मृतक), वय 55 वर्ष, रा. बेलोना हा त्याच्या एमएच–36/जे–3498 क्रमांकाच्या हिरो होडा शाईन मोटरसायकलने गायमुख शिवारातुन रोडनी गावी परत जात होता. दरम्यान एमएच–40/एके–0896 क्रमांकाचा पिकअप गाडीचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–36/जे–3498 क्रमांकाच्या माटरसायकला समोरून धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– बेनासिंह बनापत यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रखर विरेन्द्र बनकर, वय 19 वर्ष, रा. बेलोना यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार शैलेश डोंगरदिवे 9011046672 हे करीत आहे.

2) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील मौजा जामगाव शिवार येथे दिनांक 17/03/2020 चे 14:30 वा. दरम्यान मृतक/आरोपी नामे– मनोहर पुडलींक वरठी, वय 42 वर्ष, रा. कचारी सांवगा, ता. काटोल

याने त्याच्या ताब्यातील एमएच–40 बीडब्लू–8546 क्रमांकाची मोटरसायकल भरदाव वेगाने व बेदरकारपने व मानवी जिवास धोका निर्मान होईल असे निष्काळजीपणे चालवून मोटरसायकल स्लीप झाल्याने तो खाली पडला. त्यामुळे माटरसायकल चालक स्वतःचे मरनास कारणीभुत ठरला. तसेच मागे बसलेला मनिष महादेवराव कोकोडे, वय 31 वर्ष, रा. बडेगांव ता. सावनेर हे जखमी झाले. मर्ग क्र. 16/20 वरुन तसेच चौकशी अहवालावरुन सदरचा गून्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. सोनोने 9405150351 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर श्रीराम नगर पंचवटी काटोल येथे दिनांक 20/04/2020 चे 22.00 वा. ते दिनांक 21/04/2020 चे 07.00 वा. दरम्यान खुशाल दिलीप वंजारी, वय 29 वर्ष, रा. श्रीराम नगर, पंचवटी काटोल याने त्याच्या राहत्या घरी बेडरूममध्ये दरवाजा आतुन बंद करून दुपट्टयाने पंख्याला बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिलीप मुनीश्वर वंजारी, वय 41 वर्ष, रा. श्रीराम नगर पंचवटी काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रभुदास दलाल 9823970139 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर